
एका नव्या अनुभवविश्वात वाचकांना गुंतवून ठेवणारी विज्ञान कादंबरी

# 'आदित्य'

लेखक - अरूण हेबळेकर



समीक्षक

**डॉ. वासुदेव सावंत**

अरूण हेबळेकर यांनी 'आ पासां' या कादंबरीच्या छोटेखानी प्रस्तावनेत काही लेखक 'हेवीवेट', तर काही लेखक 'लाईटवेट' असतात, असं सांगून आपण मात्र 'मिड्लवेट' लेखक असल्याचे म्हटलेलं आहे. त्यांचे साहित्य - विशेषत: कादंबऱ्या- - वाचताना त्यांच्या या विधानाची सत्यता पटते. त्यांनी स्वत:ला 'मिडल्वेट' लेखक म्हणवून घेणे अनेकदृष्ट्या अर्थपूर्ण आहे. वाचनीयता हा त्यांच्या साहित्याचा एक महत्त्वाचा गुण असला, तरी ते केवळ करमणूकप्रधान, रंजनात्मक साहित्य लिहिणारे लेखक नाहीत. तसेच मानवी जीवनवास्तवाचे भान जरी त्यांच्या साहित्यातून व्यक्त होत असले, तरी सर्वसामान्य वाचकांना न पेलवणारे, केवळ समीक्षकांनीच उचलून धरलेले असे तथाकथित उच्च दर्जाचे कलात्मक साहित्यही ते लिहीत नाहीत. त्यांनी मधला मार्ग स्वीकारलेला आहे. या अर्थाने ते मिडल्वेट लेखक आहेत. रंजकता आणि जीवनदर्शन या दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या साहित्यातून केलेला आहे, हे त्यांच्या कादंबरीलेखनाबाबत विशेषत्वाने दिसून येते. त्यांच्या या मध्यममार्गीय भूमिकेचा त्यांच्या कादंबऱ्यांच्या वाङ्मयीन स्वरूपावरही परिणाम झालेला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून 'आदित्य' या कादंबरीकडे पहाता येते.

हेबळेकर यांच्या एकूण कादंबरीलेखनाचा विचार केला, तर 'सलोमीचे नृत्य' पासून 'आदित्य' पर्यंतच्या कादंबऱ्यांचा एक आणि 'आदित्य' नंतर लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांचा दुसरा असे दोन गट स्पष्टपणे करता येतात. पहिल्या गटातील कादंबऱ्यांमध्ये

रंजनात्मकतेपेक्षा वास्तवदर्शन हा घटक अधिक प्रभावी आहे. तर 'आदित्यनंतरच्या कादंबऱ्या रंजनात्मकतेकडे, काहीशा अद्भुतरम्यतेकडे अधिक झुकणाऱ्या आहेत. 'आदित्य' ही या दोन गटांच्या सीमारेषेवरची कादंबरी आहे. त्यामुळे तिच्यामध्ये वास्तवदर्शन आणि रंजक वाचनीयता यांचा सुयोग्य समन्वय साधलेला दिसून येतो.

(आशयसूत्रांची विविधता हे अरूण हेबळेकर यांच्या कादंबऱ्यांचे एक ठळक वैशिष्ट्य आहे.) 'सलोमीचे नृत्य' - सारख्या समाजदर्शनात्मक कादंबरीपासून ते 'जोनास आर्क' सारख्या विज्ञानकथेपर्यंत अनेकविध कथाविषय त्यांनी सामर्थ्याने हाताळलेले आहेत. परस्परांहून एकदम भिन्न आणि मराठी वाचकाला बरीचशी अपरिचित असणारी अशी विविध अनुभवक्षेत्रे निवडून त्यांचे अनेक बारकाव्यांसह रिॲलिस्टिक शैलीने चित्रण करणे हा हेबळेकरांच्या कादंबरीलेखनाचा महत्त्वाचा विशेष आहे. 'आदित्य' या कादंबरीसाठीही त्यांनी असेच एक वेगळे अनुभवक्षेत्र निवडलेले आहे. अणु-उर्जा प्रकल्प आणि तेथे काम करणारे वैज्ञानिक यांचे विश्व 'आदित्य' मधून उभे केलेले आहे. तिचे आशयसूत्र वैज्ञानिक जगाशी संबंधित असले, तरी ती वैज्ञानिक कादंबरी नाही. वैज्ञानिक कादंबरीपेक्षा तिचे स्वरूप इंग्रजी आपत्तिपटाशी किंवा त्याप्रकारच्या कादंबऱ्यांशी अधिक जुळणारे आहे. 'मानवी समूहांवर आकस्मिकपणे येणारे संकट किंवा आपत्ती आणि त्यातून सुटण्यासाठी चाललेली माणसांची धडपड' हे कथासूत्र अनेक इंग्रजी चित्रपटांतून व कादंबऱ्यांतून हाताळलेले दिसते. 'आदित्य' चे कथासूत्रही याच प्रकारचे आहे. 'आदित्य' मध्ये हे संकट अणुभट्टीत झालेल्या बिघाडामुळे येऊ घातलेले आहे.

'आदित्य' हे अणुभट्टीचे किंवा वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाले तर 'फ्यूजन रीॲक्टर' चे नाव आहे. वीजनिर्मितीसाठी बांधला गेलेला हा पहिलावहिला फ्यूजन रीॲक्टर कारवार जिल्ह्याच्या किनारपट्टीवर उभारला गेलेला आहे. अमेरिका आणि रशिया या देशात फ्यूजनप्रक्रियेवर आधारलेली अणुभट्टी उभारली जाण्यापूर्वीच भारतात ती प्रथम उभारली गेलेली आहे. भरत बसरूर या शास्त्रज्ञाच्या कल्पकतेमुळे या अणुभट्टीत हैड्रोजनच्या दोन अणुगर्भांचे एक लाख सेल्सियस तपमानावर मीलन घडवून ऊर्जा निर्माण केली जाते. हे मीलन (फ्यूजन) घडविण्यासाठी 'ऑर्फन' हे मध्यस्थ द्रव्य (कॅटेलिस्ट) या भट्टीसाठी वापरावे लागते. हे मध्यस्थ द्रव्य अणुभट्टीत योग्य प्रमाणात सोडणे हे काम स्टॅन डेमियन या शास्त्रज्ञाचे आहे. फ्यूजनप्रक्रिया घडून आल्यावरही बराचसा हैड्रोजन भट्टीमध्ये शिल्लक राहून वाया जातो. तो जाळावा लागतो. ही जाळण्याची क्रिया धोकादायक ठरण्याची शक्यता असते. म्हणून वाया जाणाऱ्या हैड्रोजनचे प्रमाण कमी करण्यासाठी डेमियन अणुभट्टीत अधिक प्रमाणात ऑर्फन सोडण्याचा निर्णय घेतो. पण त्याचा हा निर्णय घातक ठरतो. आणि फ्यूजन रीॲक्टर नियंत्रणाबाहेर जाऊ लागतो. तपमानाची कमाल मर्यादा ओलांडून ते वाढू लागते. तपमान असेच वाढत राहिल्यास पूर्ण अणुभट्टीचाच स्फोट होण्याची शक्यता आहे. आणि हा स्फोट हैड्रोजन बॉम्बच्या स्फोटाइतकाच विध्वंसक असणार आहे. रशियातल्या चर्नोबिल अपघाताचीच

पुनरावृत्ती होऊ घातलेली आहे. प्रकल्पावर काम करणारे सर्व लोक व तिथली वसाहत या स्फोटाने नष्ट होणारच आहे पण स्फोटाचा हादरा २५०-३०० किलोमीटरच्या परिसराला बसणार आहे. किरणोत्सर्जन वगैरे धोके आहेतच. प्राणहानी, वित्तहानी याबरोबरच या स्फोटाचे परिणाम सामाजिक, राजकीय अशा अनेक पातळ्यांवर होणार आहेत. अणुभट्टी उभारण्याविरूद्ध आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना, वर्तमानपत्रांना आणि विरोधी पक्षांनाही सरकारला कोंडीत पकडण्याची संधी मिळणार आहे.

हाताबाहेर गेलेली अणुभट्टी आणि तिच्यामुळे निर्माण झालेला धोका ही आपत्ती 'आदित्य' कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. ही आपत्ती निर्माण होणे आणि नंतर प्रचंड धडपड व प्रयत्न यातून तिचे निवारण होणे हे 'आदित्य' कादंबरीचे आशयसूत्र आहे. या आपत्ती निर्मितीचे आणि निवारणाचे हेबळेकर यांनी केलेले चित्रण अत्यंत उत्कंठावर्धक आणि वाचकाला खिळवून ठेवणारे आहे. पण एवढेच असते, तर ही कादंबरी केवळ एक रंजनात्मक आणि वाचनीय कादंबरी ठरली असती. पण तसे होत नाही. केवळ रंजनाच्या पातळीवर न राहाता वाङ्मयीन गुणवत्तेच्या काही किमान पातळीवरही ती जाते. ही गुणवत्ता तिला कशामुळे प्राप्त होते याचा शोध घेतल्यास या कादंबरीची काही वाङ्मयीन वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

ही कादंबरी केवळ रंजनात्म न होण्याचे एक कारण म्हणजे तिची वास्तववादी शैली. लोकप्रिय रंजनात्म कादंबऱ्या ह्या प्रकृतीने प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या अद्भुतरम्यतेकडे झुकणाऱ्या वास्तवाकडे, वास्तवातल्या खऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या असतात. साचेबंद तंत्राने जाणाऱ्या असतात. पण 'आदित्य' ची प्रकृती अशा प्रकारची नाही. या कादंबरीच्या केंद्रस्थानी असणारी जी समस्या आहे, ती काहीशी अपवादात्मक असली तरी ती वास्तवच आहे. आजच्या प्रगत वैज्ञानिक युगातल्या वास्तवाशी संबंधित आहे. वीजनिर्मितीसाठी अणुतंत्रज्ञानाचा वापर जगातल्या अनेक देशात, भारतातही आज केला जातो. पण कोणतीही अणुभट्टी म्हटली, की धोका हा अध्याहृत् असतोच. हे धोके अनेकदा प्रत्यक्षात उतरलेले आहेत. रशियातील चेर्नोबिलची घटना हे त्याचेच एक उदाहरण. 'आदित्य' मध्ये चेर्नोबिलचा उल्लेख आहेच. कदाचित त्या घटनेवरूनच लेखकाला 'आदित्य' चे कथानक सुचले असणे शक्य आहे. भारतातील अणुप्रकल्पांच्या सुरक्षिततेविषयी परदेशी माध्यमे अनेकदा शंका व्यक्त करताना दिसतात. या सर्व उदाहरणांवरून अणुभट्टीला धोका निर्माण होणे, किंवा तिच्यामध्ये काही अपघात घडण्याची शक्यता असणे ही आजच्या काळातली एक जीवघेणी समस्या बनू शकते. या समस्येकडे 'आदित्य' कादंबरी आपले लक्ष वेधून घेते.

'आदित्य' मधील मुख्य कथासूत्र असे वास्तवाशी निगडित आहे. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे आशयसूत्र मांडण्याची जी पद्धती किंवा शैली आहे तीसुद्धा वास्तववादी कादंबरीची शैली आहे. बारीकसारीक अशा विविध तपशीलांसह एखाद्या घटनेचे जिवंत व प्रत्ययकारी चित्र निर्माण करणे हा वास्तववादी शैलीचा एक विशेष मानला जातो.

'आदित्य' मध्ये अणुभट्टी नियंत्रणाबाहेर जाणे आणि तिला पुन्हा नियंत्रणाखाली आणणे या मुख्य घटना वास्तवदर्शी तपशिलांमुळे अशाच प्रत्ययकारी झालेल्या आहेत. अणुप्रकाल्पाचे एक अनोखे जगच या कादंबरीतून वाचकांपुढे साकार होते. आण्विक उर्जा प्रकल्पाची उभारणी, अणुभट्टी, तिच्यात चालणारी अणुसंयोगाची (फ्यूजनची) प्रक्रिया, अणुभट्टीचे काम चालविणारे वेगवेगळे विभाग आणि त्यात काम करणारे शास्त्रज्ञ, कंट्रोल रूम, चार्जिंग रूम, कंट्रोल पॅनल्स, अचानक धोका उद्‌भवल्यास अणुभट्टी नियंत्रणात आणण्यासाठी योजिले जाणारे सुरक्षा उपाय - हेलियम लिक्विफायर्स, ओ-टू प्रकल्प, फायबरग्लास सँडविचं भिंती इ. अशा प्रकारच्या असंख्य तपशिलांतून अणुप्रकल्पाचे चित्र कादंबरीत उभे केले जाते. तसेच अणुप्रकल्पाला धोका निर्माण झाल्याचे कळताच शास्त्रज्ञांपासून ते सरकारी यंत्रणेपर्यंत सर्वांची होणारी धावपळ, अणुभट्टी नियंत्रणाबाहेर गेल्याची बातमी बाहेर फुटू नये म्हणून त्यांचा चाललेला आटापिटा, या प्रकरणावरून सरकारला कोंडीत पकडू पहाणारे पत्रकार आणि विरोधक, अणुप्रकल्पाच्या सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी, त्या त्रुटींवर मात करून वेगवेगळ्या उपायांनी अणुभट्टी नियंत्रणाखाली आणण्याची शास्त्रज्ञांची धडपड, या उपायांचे परिणाम दिसेतो-पर्यंत ताणलेली त्यांची साशंक उत्कंठा आणि धोका टळल्यानंतर शास्त्रज्ञांमध्ये होणारा सुटकेचा जल्लोष अशा असंख्य घटनांतून कादंबरीचे कथासूत्र विकसित होत जाते आणि वाचक या सर्व तपशिलांमध्ये पूर्णपणे गुंतून जातो. या सर्व बारकाव्यांतून, घटनांतून कादंबरीतले अनुभवविश्व त्याच्या अंगोपांगांसह साकार होत जाते व कादंबरीची परिणामकारकता वाढते. अशा प्रकारे अणुप्रकल्पाशी संबंधित अशा एका वैज्ञानिक जगाचे वास्तवदर्शी चित्रण हा 'आदित्य' च्या वाङ्मयीन गुणवत्तेचा एक विशेष ठरतो.

या कादंबरीला वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त करून देणारा दुसरा विशेष म्हणजे तिला असणारे मानवी जीवनदर्शनाचे आणि नैतिकतेचे परिमाण हा होय. 'आदित्य' ही केवळ अणुप्रकल्पाला निर्माण झालेल्या धोक्याची, संकट आणि सुटका या साच्यातली कादंबरी आहे असे नाही. अणुप्रकल्पाबरोबरच ती भरत बसरूर या शास्त्रज्ञाची आणि माणसाचीही कहाणी आहे. भरत बसरूर हे या कादंबरीतील नायक-पात्र आहे. भरत हा एक बुद्धिमान आणि महत्त्वाकांक्षी शास्त्रज्ञ आहे. 'आदित्य' या अणुभट्टीची उभारणी हे त्याच्याच बुद्धिमत्तेचे आणि महत्त्वाकांक्षेचे अपत्य आहे. या कादंबरीत त्याच्या कहाणीची सुरूवात होते, ती त्याच्या मुंबईमधल्या जीवनापासून. तिथे भाभा अणुसंशोधन केंद्रात पी.एच्‌डी साठी संशोधन करत असतानाच मध्यस्थप्रक्रियेद्वारे (कॅटेलिस्टिक रीॲक्शन) अणुमीलनाची (फ्यूजन) प्रक्रिया कशी घडवून आणता येईल या प्रश्नावर त्याचे लक्ष केंद्रित झालेले आहे. पण या विषयावरील संशोधनासाठी आवश्यक ती साधने त्याला येथे उपलब्ध नाहीत. पी.एच्‌डी नंतर भरतला पुढे अमेरिकेत बर्कले येथे डॉ. बार्कर यांच्या हाताखाली संशोधन करण्याची संधी मिळते. इथल्या संशोधनाचा फायदा होऊन फ्यूजन रीॲक्टरसंबंधी नव्या नव्या संकल्पना त्याला सुचतात. तो भारतात परत येतो, तो फ्यूजन रीॲक्टरसंबंधी नवा प्रकल्प उभारण्याची महत्त्वाकांक्षा घेऊनच.

भरतच्या सुदैवाने ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची संधी त्याला मिळते. भारत सरकारच्या उर्जामंत्रालयाकडून सांयुगिक प्रक्रियेवर आधारलेला अणु-उर्जा प्रकल्प उभारण्याची जबाबदारी भरत बसरूरवर सोपविली जाते आणि सांयुगिक प्रक्रियेवर आधारलेला जगातला पहिलाच अणुप्रकल्प उभा करून तो आपल्या आयुष्यातील कर्तृत्वाचे सर्वोश्च शिखर पादाक्रान्त करतो. एक शास्त्रज्ञ म्हणून भरतचे जीवन एकीकडे या बौद्धिक यशाने झगमगून निघालेले आहे. पण दुसरीकडे त्याचे भावनात्मक जीवन मात्र अस्वस्थेतेने व्यापून गेलेले आहे. त्याचे कौटुंबिक जीवन त्याचे मनःस्वास्थ्य हरवून टाकणारे आहे. संशोधक विद्यार्थी म्हणून काम करत असताना बँकेत काम करणाऱ्या छाया बल्सेकर या तरूणीशी भरतची ओळख होते. ओळखीची परिणती विवाहात होते. लग्नानंतर लवकर मूल नको म्हणून छाया भरतला न सांगताच पहिल्याच वेळी गर्भपात करून घेते. पुढे जेव्हा मूल हवेसे वाटते तेव्हा गर्भ टिकत नाही. अखेर चौथ्या वेळी गर्भ टिकून मुलगी जन्माला येते, पण मेंदूचा असाध्य विकार घेऊनच. मांसाचा एक नुसता जिवंत गोळा. या सर्व परिस्थितीमुळे भरतच्या पत्नीचे मानसिक संतुलन अधूनमधून बिघडू लागते. त्यामुळे तिचे मुलीकडेही दुर्लक्ष होऊ लागते. मग भरतला मुलीसाठी अधिक वेळ देणे भाग पडते. एकीकडे प्रकल्पउभारणीच्या कामाचा व्याप आणि दुसरीकडे कौटुंबिक पातळीवरील ही अस्वस्थ करणारी परिस्थिती या तणावात सापडलेल्या भरतच्या मनातील आंदोलने लेखकांने कादंबरीत प्रभावीपणे रेखाटलेली आहेत. मुलीशी निर्माण झालेल्या भरतच्या भावनात्मक नात्याचेही सुरेख चित्रण कादंबरीत आलेले आहे.

आपल्या अपंग मुलीचा - सुनीचा - प्रश्न सोडविण्याचा मार्ग भरतला अचानकपणे सापडतो: फ्यूजन रिॲक्टरचे तंत्र अमेरिकेला विकून मिळालेल्या पैशातून मुलगी बरी होते. पण गुन्हेगार म्हणून तिहारच्या तुरूंगात त्याची रवानगी होते.

भरतनंतर आदित्यच्या प्रमुख संचालकपदी उर्जा मंत्र्यांच्या नात्यातील अनिरूद्ध भारद्वाज यांची वर्णी लागते. संचालकपदी आल्याआल्याच आपणास पैसे खाण्याची संधी कोणकोणत्या कामात मिळू शकेल याचाच विचार भारद्वाज करू लागतात आणि 'आदित्या'च्या सुरक्षतेकडे दुर्लक्ष करून स्वतःचा खिसा भरण्याचा प्रयत्न ते करतात. स्वतःच्या क्षुद्र स्वार्थासाठी देशहित आणि लोकहिताला तिलांजली देण्याची ही प्रवृत्ती आपल्या देशात फार झपाट्याने वाढीला लागलेली दिसतेच. हेबळेकरांनी या प्रवृत्तीचे दर्शन भारद्वाज यांच्या रूपाने घडविलेले आहे.

'आदित्य' च्या सुरक्षा आराखड्याची अशी वासलात लावणाऱ्या भारद्वाजांना प्रत्यक्ष संकटाच्या वेळी 'आदित्य' नियंत्रणात कसा आणावा हे समजेनासे होते. शेवटी 'आदित्य' ला नियंत्रणात आणण्यासाठी तुरूंगवास भोगणाऱ्या भरत बसरूरलाच बोलावून आणावे लागते. आपण तयार केलेल्या सुरक्षा आराखड्याची भारद्वाजांनी अंमलबजावणी केलेली नाही; ओ-टू प्रकल्प तयार नाही, फायबर-ग्लास-स्टील सँडविचेस् तयार

नाहीत, हेलियमचा पुरेसा साठा नाही हे भरतच्या लक्षात येते. या सुरक्षा उपायांशिवाय 'आदित्य' ला नियंत्रणात आणणे हे अत्यंत कठीण - अशक्यप्राय - काम आहे. पण भरत हे अशक्यप्राय काम घडवून आणतो. मात्र भारद्वाजांना त्यांच्या कृत्याची जाणीव करून दिल्याशिवायही तो राहात नाही.

भारद्वाजांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण कादंबरीत अनेक दृष्ट्या महत्त्वाचे ठरते. अणुभट्टीत बिघाड होणे आणि ही आपत्ती टाळून तिला नियंत्रणाखाली आणणे ही कादंबरीतली केंद्रवर्ती घटना आहे. कादंबरी वाचकांची सारी उत्कंठा या घटनेशी निगडित झालेली आहे. अणुभट्टी नियंत्रणाखाली येणार की नाही? भरत बसरूर या प्रतिकूल परिस्थितीत काय करणार? ही वाचकाची जिज्ञासा वाढविण्याचे काम भारद्वाजांच्या भ्रष्टाचार प्रकरणाद्वारे केले जाते. या प्रकरणामुळे कादंबरीचा 'क्लायमॅक्स' अधिक टोकदार होतो. दुसरे असे, की भारद्वाजांमुळे सुरक्षाउपायांचा असा बोजवारा उडालेला असतानाही अणुभट्टी नियंत्रणाखाली आणण्याचे आव्हान भरत स्वीकारतो आणि आलेल्या आपत्तीवर यशस्वीपणे मात करतो. भरतच्या गुणवत्तेचे, त्याच्या श्रेष्ठतेचे दर्शन या घटनेतून घडते. कादंबरीतले त्याचे नायकपण ठसठसशीतपणे सिद्ध होते. अशा प्रकारे भारद्वाजांच्या भ्रष्टाचार - प्रकरणाचा उपयोग लेखकाने कादंबरीतील क्लायमॅक्सची तीव्रता वाढविण्यासाठी आणि नायकपात्राचे नायकपण अधिक ठळकपणे रेखांकित करण्यासाठी करून घेतलेला आहे.

पण भारद्वाजप्रकरण कादंबरीत एवढ्यापुरतेच महत्त्वाचे ठरत नाही. या प्रकरणातून लेखकाने काही नैतिक प्रश्न उपस्थित केलेले आहेत आणि कादंबरीला एक नैतिक परिमाण प्राप्त करून दिलेले आहे. मंत्र्याच्या वशिल्यामुळे 'आदित्य' च्या संचालकपदी आलेले भारद्वाज केवळ पैसे मिळविण्याच्या हव्यासापायी अणुप्रकल्पाच्या सुरक्षायोजनेला सुरूंग लावतात. कोणत्याही अणुप्रकल्पाच्या सुरक्षेला असाधारण महत्त्व असते. कारण अणुभट्टीच्या स्फोटामुळे प्रचंड जीवित हानी, वित्तहानी, पर्यावरणविनाश, किरणोत्सर्जन असे अनेक धोके निर्माण होतात. अशा स्थितीत स्वतःच्या क्षुद्र स्वार्थासाठी अधिकारीपदावरील व्यक्तीने अणुप्रकल्पाच्या सुरक्षाव्यवस्थेशी खेळ करणे हा नैतिकदृष्ट्या फार मोठा गुन्हा ठरतो. पण असा गुन्हा करूनही भारद्वाज सरकारच्या किंवा समाजाच्या दृष्टीने अधिकृतपणे गुन्हेगार ठरलेले नाहीत. या उलट ज्याने अनेक वर्षे परिश्रम करून महत्त्वाकांक्षी असा 'आदित्य' अणुप्रकल्प उभा केला, वैज्ञानिक क्षेत्रात देशाला मानाचे स्थान मिळवून दिले त्या भरत बसरूरला मात्र देशद्रोहाच्या गुन्ह्याखाली तुरूंगवास भोगावा लागतो. या दोन्ही घटनांमधला विरोधाभास लेखकाने दाखविलेला आहे. भरतने आपले गुप्त संशोधन परदेशाला विकल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आलेला आहे. खरे तर विज्ञानातील कोणतेही संशोधन किंवा कोणताही नवा सिद्धांत हा एकट्याच्या मालकीचा नसतो. कधी ना कधी, तो सार्वजनिक होतच असतो. विज्ञान हे सर्वांसाठीच असते. त्यामुळे भरतने आपले संशोधनाचे रहस्य अमेरिकन संस्थेला सांगणे यात तसे अनैतिक काहीच नाही. तरीही भरतला देशद्रोही ठरवून शिक्षा केली

जाते. मुलीच्या औषधोपचारासाठी पैसे मिळावेत एवढ्याच हेतूने भरतने आपले संशोधनरहस्य उघड केलेले नाही. आपण वस्तुस्थिती सांगितली नाही, तर आपण हैड्रोजन बॉम्ब बनवित आहोत असा आरोप अमेरिकन शास्त्रज्ञांकडून होईल; तसा तो होऊ नये म्हणून भरतला आपले संशोधन नेमके काय आहे ते सांगावे लागले आहे. केवळ पैसेच मिळवायचे असते तर साडेतीनशे कोटीचा 'आदित्य' प्रकल्प उभारताना भरत कितीही पैसे मिळवू शकला असता. पण तसे न करता भरतने आपले नैतिक भान दाखवून दिलेले आहे. मात्र देशभक्तीचे भावनात्मक भांडवल करून त्याला गुन्हेगार ठरविण्यात आले.

भरत आणि भारद्वाज या दोघांच्या परस्परविरोधी वर्तनाचे चित्र कादंबरीतून वाचकांसमोर ठेवून लेखकाने व्यक्तीच्या कृतीची नैतिकता कशावरून ठरवायची असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. पैसे खाण्याच्या मोहापायी देशाच्या एका महत्त्वाच्या अणुप्रकल्पाला धोका निर्माण करणारे भारद्वाज देशद्रोही, की आपल्या एकुलत्या एक मुलीच्या उपचारासाठी आपले संशोधन परदेशाला विकणारा भरत् देशद्रोही? भरतने आपले संशोधन प्रथम आपल्याच देशासाठी वापरलेले आहे. जगातला पहिला फ्यूजन रीॲक्टर तयार करुन देशाला एक सौरउर्जाप्रकल्प त्याने उभा करून दिलेला आहे. यादृष्टीने भरत हा खरेतर एक महान देशभक्तच ठरतो. पण संशोधन विकल्याबद्दल देशाने, देशातल्या कायद्यानेही त्याला गुन्हेगार ठरविलेले आहे, देशद्रोही ठरविलेले आहे. यावरून देशद्रोह किंवा देशभक्ती याबद्दलचे व्यक्तीच्या वर्तनाला लावण्यात येणारे नैतिक निकष कसे सापेक्ष असतात हे लेखकाने या कादंबरीतून सूचित केलेले आहे. कादंबरीतील कथासूत्राला असे नैतिक परिमाण दिल्याने 'आदित्य' ही केवळ उत्कंषठावर्धक, रोमांचकारी कादंबरी रहात नाही; तिला काहीएक वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त होते. साहित्यकृती म्हणून ती यशस्वी ठरते.

या वाङ्मयीन यशस्वितेला कादंबरीच्या रचनाबंधाने आणि कथनतंत्रानेही हातभार लावलेला आहे. या कादंबरीची कथनशैली वास्तववादी असल्याचा उल्लेख वर केलेलाच आहे. परंतु वास्तववादी कथनशैली तपशीलबहुलतेमुळे कधी कधी कंटाळवाणी होऊ शकते. 'आदित्य' मध्ये अणुप्रकल्पाविषयीचे, वैज्ञानिक विश्वाविषयीचे अनेक सूक्ष्म तपशील येतात. पण ते कंटाळवाणे मात्र होत नाहीत. कारण ते सर्व तपशील पक्क्या घटनात्मक सूत्राने बांधलेले असतात. मुख्य कथासूत्राच्या अंगाने या तपशीलांची मांडणी करणारा कादंबरीचा रचनाबंध अतिशय आटोपशीर आणि सुबद्ध आहे. कादंबरीच्या कथानकाची विभागणी एकूण पाच भागांत केलेली असून प्रत्येक भागात घटनांच्या अनुषंगाने छोटे छोटे उपविभाग केलेले आहेत. ते एक - दोन - तीन अशा अंकानी दर्शविलेले आहेत. या रचनेमुळे अनावश्यक विस्तार व पाल्हाळ टळून कथानक रेखीव व गतिमान झालेले आहे. कथानक अधिकाधिक उत्कंठावर्धक करणारे रचनातंत्र वापरलेले आहे. फ्लॅशबॅकसारख्या परिचित तंत्राचा त्यासाठी अधिक अर्थपूर्ण उपयोग केलेला दिसून येतो.

पहिल्या भागात कथानकाचा प्रारंभ डेमियनच्या घरातील ख्रिसमस पार्टीच्या वर्णनाने होतो. पार्टी चालू असतानाच ऐन मध्यरात्री 'आदित्य' हाताबाहेर चालल्याची बातमी फोनवरून येते आणि कादंबरीतील मुख्य घटनेचा उपोद्घात होतो. पहिल्या भागात अणुप्रकल्पाला निर्माण झालेल्या धोक्याचे स्वरूप काय, त्यावर काय उपाययोजना करावी यावर चाललेली प्रकल्पातील शास्त्रज्ञांची चर्चा, बातमी गुप्त ठेवण्याची धडपड यांचे वर्णन येते आणि पहिल्या भागाचा शेवट 'भरत बसरूरला तिहार तुरूंगातून येथे आणल्याशिवाय 'आदित्य' ला नियंत्रणाखाली आणता येणार नाही' या वेणूच्या आकस्मिक सूचनेने होतो. अशा प्रकारे पहिल्या भागाच्या शेवटी कादंबरीतील नायकपात्राचा फक्त नामनिर्देश केला जातो. दुसरा भाग भरतचे तिहार तुरूंगातून 'आदित्य' प्रकल्पावर येणे या मुख्य घटनेने व्यापलेला आहे. तर भाग तीन आणि चारमध्ये फ्लॅशबॅकचे तंत्र वापरून भरत बसरूरची आणि त्याने 'आदित्य' प्रकल्प कसा उभा केला याची माहिती दिली जाते. पाचव्या म्हणजे शेवटच्या भागामध्ये भरतने अनेक अडचणींवर मात करून 'आदित्य' कसा नियंत्रणाखाली आणला याचे प्रत्ययदर्शी वर्णन येते आणि शिक्षेला मिळणारी माफी नाकारून भरत धीरोदात्तपणे पुन्हा तिहार तुरूंगाकडे रवाना होतो, या घटनेने कादंबरीचा शेवट होतो. पहिल्या चारही भागाचे प्रारंभ आणि शेवट कथानकाबद्दल वाचकाची जिज्ञासा व उत्कंठा वाढवतील अशा पद्धतीने रचलेले आहेत. पाचव्या भागात ही उत्कंठा शीगेला पोहोचवून वाचकांना अपेक्षित असाच परिणाम शेवटी साधलेला आहे. या सुबद्ध रचनेमुळे कादंबरीला आकर्षक वाचनीयता प्राप्त झालेली आहे. अनावश्यक तपशील व वर्णने टाळल्यानेही कथानक गतिमान व परिणामकारक झालेले आहे. भाषा ही कथनाचे माध्यम म्हणूनच कादंबरीभर कायम राहाते. ती स्वतंत्रपणे लक्षवेधक ठरत नाही. कथानकाच्या गतिमानतेला भाषा कुठेही अडसर ठरत नाही. कादंबरीच्या भाषिक रूपाचे हे मुख्य वैशिष्ट्य ठरते.

अशा प्रकारे 'आदित्य' ही अरूण हेबळेकरांची कादंबरी मराठीत एक नवे अनुभवविश्व साकारणारी, वाचकाला या नव्या अनुभवविश्वात सहजपणे गुंतवून ठेवणारी आणि आकर्षक कथानकामुळे अत्यंत वाचनीय ठरणारी अशी कादंबरी आहे. कोणत्याही रंजक व लोकप्रिय कादंबरीप्रमाणे ती कथानकप्रधान आहेच. पण या कथानकाला वास्तवदर्शी शैली, सुबद्ध रचनाबंध आणि मानवी जीवनातील भावनात्मक व नैतिक अंगाची जोड दिल्याने या कादंबरीला काही एक वाङ्मयीन गुणवत्ताही प्राप्त झालेली आहे. वास्तवदर्शी शैली आणि आशयाला मानवी जीवनाचे परिमाण या गुणवैशिष्ट्यांमुळे ती रूढ विज्ञान साहित्यापेक्षा वेगळी ठरते. ही रूढ अर्थाने विज्ञान कादंबरी नाही याचा उल्लेख प्रारंभी केलेलाच आहे. त्याचे काही स्पष्टीकरण येथे करणे आवश्यक आहे. विज्ञान साहित्यात विज्ञान हाच मुख्य कथनविषय असतो. मानवी वास्तवाचे दर्शन, मानवी स्वभावाचे चित्रण हे त्याचे मुख्य उद्दिष्ट नसते. माणसाच्या अंतर्जीवनातील खोलवरचे भावनात्मक किंवा नैतिक प्रश्न उपस्थित करणे हा विज्ञान साहित्याचा मुख्य हेतू नसतो. काही विज्ञानसाहित्य विज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगत पण सामान्यांना अपरिचित अशा वैज्ञानिक सिद्धांतांचा काल्पनिक कथाविश्वाच्या द्वारे परिचय करून देणारे असते,

तर बरेचसे विज्ञान साहित्य आज अकल्पनीय वाटणाऱ्या, पण वैज्ञानिकदृष्ट्या भविष्यकाळात कधी ना कधी संभवनीय ठरू शकणाऱ्या अशा शक्यतांचा वेध काल्पनिक कथानकाच्या आधारे घेत असते. त्यामुळे बहुतांश विज्ञान साहित्याची प्रकृती अद्‌भुतरम्यतेकडे झुकणारी असते. एका विशिष्ट मर्यादेपलिकडे विज्ञान साहित्याला वास्तव-अवास्तवाच्या कसोट्या लावत येत नाहीत. गंभीर, कलात्मक समजल्या जाणाऱ्या साहित्याचे मूल्यमापन ज्या निकषांच्या आधारे होते ते निकष विज्ञान साहित्याला लावणे फारसे योग्य ठरत नाही.

हेबळेकरांची 'आदित्य' कादंबरी वरीलप्रकारच्या विज्ञान साहित्याच्या साच्यात बसणारी कादंबरी नाही. विज्ञानातील संभाव्य शक्यतांचा ती वेध घेत नाही किंवा कोणत्याही अद्‌भुतरम्य घटितांचे चित्रण ती करीत नाही. अंतराळातील अद्‌भुत घटना, परग्रहावरील जीव, रक्तवाहिन्यातून केलेला अद्‌भुतप्रवास किंवा अशाच प्रकारचे वैज्ञानिकदृष्ट्या शक्य असणारे चमत्कार यांचे वर्णन 'आदित्य' मध्ये नाही. वैज्ञानिकांचे जग हा तिचा चित्रणविषय असला आणि अणुप्रकल्पाविषयीची भरपूर माहिती ती देत असली, तरी ती विज्ञान काल्पनिका नाही. म्हणून 'आदित्य' ची तुलना मराठीतील जयंत नारळीकर, निरंजन घाटे, लक्ष्मण लोंढे किंवा सुबोध जावडेकर यांच्या विज्ञान साहित्याशी फार मर्यादित प्रमाणातच करता येईल. यामुळेंच 'आदित्य' चा विज्ञान कादंबरी म्हणून विचार न करता कादंबरीच्या किंवा वाङ्‌मयीन कृतीच्या सर्वसामान्य निकषांवरच तिचे यशापयश निश्चित केले पाहिजे.

हीच भूमिका घेऊन आतापर्यंत आपण या कादंबरीच्या वाङ्‌मयीन गुणवत्तेचा विचार केला. या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा, की 'आदित्य' ही 'संकट आणि सुटका' हा कथेचा सनातन व लोकप्रिय असा 'मूलबंध' वापरणारी, उत्कंठावर्धक कथनतंत्राने वाचनीय बनलेली आणि रंजनात्मक कथासूत्र असूनही त्याला मानवी जीवनाशय प्राप्त करून देणारी एक यशस्वी साहित्यकृती आहे. 'आदित्य' चे वाङ्‌मयीन यश मान्य करून सुद्धा तिच्या एकूण मूल्यमापनासंदर्भात काही प्रश्न उपस्थित करता येतात. एक श्रेष्ठ दर्जाची गंभीर साहित्यकृती किंवा कादंबरी वाचल्याचे समाधान 'आदित्य' आपणास देते काय? या प्रश्नाचे संपूर्णपणे होकारार्थी उत्तर देता येणे कठीण आहे. उत्तम समजल्या जाणाऱ्या कादंबऱ्या मुख्यत: जीवनदर्शनाच्या हेतूने प्रेरित झालेल्या असतात. वास्तवातील प्रश्नांसंबंधी काहीएक भान वाचकांना त्या करून देत असतात. वाचकांना वास्तवासंबंधी काही अंतर्दृष्टी त्या प्राप्त करून देत असतात. लेखकाच्या गंभीर जीवनदृष्टीचा प्रत्यय अशा कादंबऱ्यांतून येत असतो. उत्तम कादंबरीकडून असणाऱ्या या अपेक्षा 'आदित्य' पूर्ण करते काय? याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. 'आदित्य'- ला मानवी जीवनदर्शनाचा काही एक संदर्भ आहे, कांही नैतिक प्रश्नही तिने उपस्थित केलेले आहेत. पण जीवनदर्शन किंवा नैतिक प्रश्नांची मांडणी हा तिचा मुख्य हेतु नाही. 'संकट आणि सुटका' या मूलबंधावर आधारलेले एक कथासूत्र प्रभावीपणे मांडणे हाच तिचा हेतू आहे. हे कथासूत्र अत्यंत आकर्षकपणे मांडण्याचे

लेखकाचे कौशल्य दाद देण्यासारखे आहे; पण तरीही 'आदित्य' ची मूळ प्रकृती 'लोकप्रिय' साहित्याचीच आहे हे लक्षात येते.

नैतिक प्रश्नांना काही प्रमाणात ती स्पर्श करीत असली, तरी जीवनचिंतनाचा किंवा लेखकाच्या जीवनदृष्टीचा काही खास प्रत्यय तिच्यातून येतो असे म्हणता येत नाही. अणुप्रकल्पासारख्या महत्त्वाच्या प्रकल्पात भ्रष्टाचार असावा का? हा प्रश्न महत्त्वाचा आहेच. पण अणुप्रकल्प किंवा तत्सम कोणत्याही मोठ्या औद्योगिक प्रकल्पाबाबत याहूनही अधिक महत्त्वाचे व मूलभूत प्रश्न उपस्थित होत असतात. या प्रश्नांचा संबंध एकूण मानवी विकासाशी असतो. मानवी विकासासंबंधीही परस्परविरोधी भूमिका आज अस्तित्वात आहेत आणि त्यांच्यामध्ये संघर्षही दिसून येतो. त्यामुळे विकासाच्या नावाखाली जेव्हा असे मोठे प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा त्याविरूद्ध लोकांची आंदोलने झाल्याचे दिसते. त्यामुळे अशा प्रकल्पांच्या उभारणीशी अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक आणि विकासाच्या संकल्पनेविषयक असे अनेक प्रश्न निगडित झालेले असतात. आण्विक शक्तीचा वापर शांततामय कामासाठी जरी केलेला असला, तरी तिच्या वापरात काही धोके अध्याहृत असतातच. अणुऊर्जा हाच ऊर्जानिर्मितीचा एक महत्त्वाचा विकल्प म्हणून पुढे आणणे यामागेही एक राजकारण असल्याचे फ्रिजॉप काप्रासारख्या लेखकांनी दाखवून दिलेलेच आहे. अशा एखाद्या प्रकल्पाला केंद्रस्थानी ठेवून साहित्यकृतीची रचना करणाऱ्या लेखकाने हे सगळे प्रश्न लक्षात घेणे आवश्यक ठरते. एखाद्या प्रकल्पाविषयी किंवा एखाद्या युद्धाविषयी केवळ गौरवपूर्ण लिहिणे यातून लेखकाच्या वेगळ्या जीवनदृष्टीचा प्रत्यय येऊ शकत नाही. 'आदित्य' बाबतही हेच घडलेले आहे. त्यामुळे अनेक वाङ्मयीन गुणवैशिष्ट्ये असूनही 'आदित्य' अपेक्षित उंची गाठू शकत नाही. लेखकाने स्वत:च म्हटल्याप्रमाणे ती 'मिडल्वेट' गटातलीच साहित्यकृती ठरते.

◆ ◆ ◆

**आदित्य**
लेखक : अरुण हेबळेकर
प्रकाशक : मौज प्रकाशन गृह
खटाव वाडी - गिरगांव
मुंबई ४००००४
वर्ष : १९९०
मूल्य : ५० रु. पृष्ठे १२८

पत्ता :
**डॉ. वासुदेव सावंत**
प्रपाठक,
गोवा विद्यापीठ,
ताळीगांव पठार, (गोवा)